दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३२१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१५ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


# मराठा आरक्षणावरुन संभाजीराजे पुन्हा आक्रमक



**दै.रायगड नगरी । मुंबई**

**आज मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण करतोय, गरज पडल्यास ओबीसी आरक्षणासाठी देखील रस्त्यावर उतरणार असल्याचं खासदार संभाजीराजें छत्रपती यांनी स्पष्ट केलं आहे. मराठा आरक्षणासाठी २६ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण करणार असल्याची घोषणा संभाजीराजे छत्रपतींनी केली आहे. खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी मुंबईत आज पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षणाच्या प्रश्नी आपण २६ फेब्रुवारीपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाला बसणार असल्याचं जाहीर केलं आहे.**

याबाबत अधिक बोलताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, ''मी सर्वांना सोबत घेऊन जाणारा माणूस आहे. मी शाहू महाराजांचा वारस आहे. मला सगळ्यांना एवढंच सांगायचं आहे की आम्हाला टिकणारे आरक्षण द्या. मी सगळ्या पक्षाच्या नेत्यांना हात जोडून विनंती केली की आरक्षण द्या. आरक्षण कशामुळे गेलं हे देखील सांगितले. परंतु त्यावर काहीच हालचाल झाली नाही. मी आरक्षण रद्द झाल्यानंतर रिव्ह्यू पिटिशन दखल करा असं सांगितल. खूप दिवसांनंतर त्यावर याचिका दाखल करण्यात आली. सध्या त्याची काय स्थिती आहे हे काहीच माहिती नाही. माझं स्पष्ट मत आहे की समिती स्थापन करा.

संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, ''मराठा समाज देखील वंचित घटक आहे. २००७ पासून मी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आहे. त्यासाठीच आरक्षणाची भूमिका घेतली. मी मराठा आहे म्हणून मराठा आरक्षणासाठी लढतो आहे असं नाही. ५ मे २०२१ ला आरक्षण रद्द झालं. त्यावेळी मला समन्वयकांनी सांगितलं की टोकाची भूमिका घेऊ नका. मोजून पाच ते सहा मागण्या आहेत. परंतु अजूनही मान्य होत नाहीत. मागील काही दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी मी अनेक दिग्गजांच्या भेटी घेतल्या आहेत. राज्यभरातील अनेकांसोबत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी चर्चा केली आहे परंतु सरकार काहीच हालचाल करत नाही. त्यामुळे आता २६ फेब्रुवारीला मी स्वतः आमरण उपोषणाला मुंबईतील आझाद मैदानात बसणार आहे,''

# पनवेलमधील न्यायालय परिसराची वाहतूक कोंडी फुटली

## पनवेल शहर वाहतूक विभागाच्या प्रयत्नांना यश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील न्यायालयाच्या परिसरात चारचाकी वाहनांना सोमवार ते शुक्रवार म्हणजेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी 'नो पार्कंग' बाबत आणि दुचाकी वाहनांना 'सम विषम पार्कंग' बाबतची अधिसुचना पनवेल शहर वाहतूक विभागाच्यावतीने घोषित करण्यात आली होती. न्यायालयासमोरील परिसरात कार्यालयीन वेळेत चारचाकी वाहने पार्किंग केल्यास व दुचाकीस्वारांनी सम विषम पद्धतीने वाहने पार्किंग न केल्यास कारवाईस सामोरे जावे लागेल, असे आवाहनही वाहतूक विभागाकडून करण्यात आले होते. त्यानुसार वाहतूक विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. अखेर वाहतूक विभागाच्या पुढाकाराने न्यायालय परिसरातील वाहतुक कोंडी फुटली असून, न्यायालय परिसराने वाहतूक कोंडीतून आता मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे नागरिक वाहतूक विभागाचे आभार मानत आहेत.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या माध्यमातून महापालिकेच्यावतीने याठिकाणी 'नो पार्किंग'चे फलकही लावण्यात आले आहेत. तरीदेखील न्यायालयात येणारे काही नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्किंग करीत असल्याचे निर्दशनास आले.

त्यामुळे पनवेल शहर वाहतूक विभागाने अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. तर काही वाहनचालकांनी प्रशासनाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत न्यायालय परिसरात वाहने पार्किंग करणे बंद केले. त्यामुळे याठिकाणची वाहतूक कोंडी फुटली असून नागरिकही येथून विनाअडथळा ये-जा करीत आहेत.

पनवेल शहरातील न्यायालय परिसरात आजुबाजुला खाजगी हॉस्पीटल, पोलीस उप आयुक्त कार्यालय, तालुका पोलीस ठाणे यासह इतरही महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. तर न्यायालयाच्या समोरील बाजुस निलपार्क, शितल, गुरुकुल व पवन अशा चार रहीवाशी सोसायटया देखील आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर वाहतूक विभागाच्या पुढाकाराने न्यायालय परिसर वाहतूक कोंडीमुक्त झाल्याने नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

# कर्जत नगर परिषदेच्या विषय समित्यांवर महायुती

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : कर्जत नगर परिषदेच्या विषय समित्यांची निवड करण्यात आली आहे, या चारही समित्यांवर शिवसेना-भाजप-आरपीआय महायुतीचे सभापती विराजमान झाले आहेत, चारही सभापती बिनविरोध विराजमान झाल्याने महायुतीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.



आज दि. १४ फेब्रुवारी रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात विषय समित्यांच्या निवडीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. निवडणूक कामकाज कामी सहाय्यक पीठासीन अधिकारी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सहकार्य केले. नगर परिषदेमध्ये १८ नगरसेवक आहेत, त्यापैकी १० नगरसेवक शिवसेना-भाजपा-आरपीआय महायुतीकडे आहेत तर ८ नगरसेवक राष्ट्रवादी - मनसे -स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी-शिवराय भिमराय क्रांती संघटना या महाआघाडीचे आहेत.

विषय समिती सभापती

स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती पदसिद्ध सभापती उपनगराध्यक्ष-अशोक ओसवाल, सदस्य-बळवंत घुमरे, विवेक दांडेकर, शरद लाड, ज्योती मेंगाळ, पाणीपुरवठा व जलनि:सारण समिती सभापती-प्राची डेरवणकर, सदस्य-विवेक दांडेकर, वैशाली मोरे, पुष्पा दगडे, मधुरा चंदन (पाटील). विज, सार्वजनिक बांधकाम, शहर नियोजन विकास समिती सभापती-राहुल डाळींबकर, सदस्य-नितिन सावंत, संचिता पाटील, उमेश गायकवाड,सोमनाथ ठोंबरे. महिला व बालकल्याण समिती सभापती-विशाखा जिनगरे, उपसभापती-संचिता पाटील सदस्य- स्वामिनी मांजरे, सुवर्णा निलधे, भारती पालकर. स्थायी समिती पदसिद्ध सभापती -अध्यक्ष सुवर्णा जोशी, सदस्य - अशोक ओसवाल, प्राची डेरवणकर, राहुल डाळींबकर, विशाखा जिनगरे

# देशाला पुढची गौरवशाली वाटचाल करायची असेल तर महाराष्ट्र बाबतीत योग्य भूमिका घेतली पाहिजे : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र म्हणजे देश आहे, देशाला पुढची गौरवशाली वाटचाल करायची असेल तर महाराष्ट्र बाबतीत केंद्र सरकारने योग्य भूमिका घेतली पाहिजे असे रायगडचे लोकप्रिय खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा तालुक्यातील मौजे साळवींडे येथे विकास कामांचे उदघाटन व भूमिपूजन कार्यक्रमाला संबोधित करताना व्यक्त केले आहे.

केंद्रीय सरकार महाराष्ट्र राज्यावर अन्याय करीत असताना त्यावर आवाज उठविण्यासाठी तुमचा खासदार म्हणून लोकसभेत मला ठणकावून सांगता आल्याने मनस्वी समाधान झाले असल्याचे खा.सुनिल तटकरे यांनी उल्लेख करताना महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी राज्याची सुत्र प्रथमच शिवजीपार्क येथील शिवतीर्थ मैदानावर महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश ज्या वेळी हाती घेतला त्या वेळी गाणकोकीला स्वर्गीय लतादीदीनी १मे १९६० मध्ये देशाचे पहिले पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत बहु असो तो सुंदर संपन्न की आँख,प्रिय आमुचा महाराष्ट्र देशाहे अजरामर गीत गायले होते याची खासदार सुनिल तटकरे यांनी आठवण करून देताना याचा मतितार्थ महाराष्ट्र म्हणजे देश आहे आणि देशाला पुढची गौरवशाळी वाटचाल करायची असेल तर महाराष्ट्र बाबतीत आताचे केंद्र सरकारने योग्य ती भूमिका घेतली पाहिजे असे सांगितले. महाराष्ट्राच्या गौरवशाली वाटचालीत श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील विकासात कुठल्याही पध्दतीने कमी पडणार नाही याची खबरदारी घेऊन आपण उत्तरार्धात काम करू अशी ग्वाही देताना विकास, आर्थिक नियोजन, रोजग-ाराची वेगवेगळी साधन, तरुणाईच्या मनातील वेगवेगळी स्वप्न,

.../२



## संक्षिप्त...

### मनसे प्रमुख राज ठाकरे हिंदुहृदयसम्राट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांना आता हिंदुहृदयसम्राट म्हणून संबोधले जाऊ लागले आहे. मुंबईतील घाटकोपरमध्ये मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते मनसेच्या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. राज ठाकरे यांच्या स्वागताची जय्यत तयारी कार्यकर्त्यांनी केली आहे. राज यांच्या स्वागतासाठी मुंबईतील घाटकोपर आणि चेंबूर परिसरात पदाधिकाऱ्यांनी भलेमोठे बॅनर लावले आहेत. या बॅनरवर राज ठाकरे यांच्या नावापुढे हिंदुहृदयसम्राट असा उल्लेख केला आहे. या बॅनरची जोरदार चर्चा मुंबईत होत आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना शिनसैनिक हिंदूहृदयसम्राट म्हणून संबोधतात. आता मनसेनेही हिंदुत्त्वाचा मुद्दा हाती घेतला असून, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट ही उपाधी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील घाटकोपरमध्ये मनसेच्या कार्यालयाचे उद्घाटन होत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली आहे. राज ठाकरे यांच्या स्वागताचे भलेमोठे बॅनर मनसेचे विभाग अध्यक्ष गणेश चुक्कल यांनी घाटकोपर, चेंबूर परिसरात लावले आहेत. यात राज ठाकरे यांच्या नावासमोर हिंदुहृदयसम्राट असा उल्लेख करण्यात आला आहे.

# बोर्ली - वांजळे रस्त्याच्या दर्जा बाबत प्रश्नचिन्ह



**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी** : श्रीवर्धन तालुक्याएतील बोर्लीपंचतन शहारांतर्गत येणाऱ्या वांजळे रस्त्याचे एकाम जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाएकडून करण्यात येत आहे. मात्र, दीर्घ प्रतीक्षेनंतर बनत असलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट असल्याने चौकशी करण्याची मागणीए ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निकृष्ट रस्ता नागरिकांच्या वाट्याला आल्याचं आरोप नागरिक करत आहे.

बोर्लीपंचतन शहरातुन अंतर्गत ग्रामीण रस्ता असल्याने कित्येक वर्षे नूतनीकरणाची मागणी करण्यात येत होती. या रखडलेल्या वांजळे रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे. नव्याने होत असलेल्या रस्त्याला डांबर अल्प प्रमाणात .../२

# आंतरराष्ट्रीय शरिरसौष्ठव विरेश धोत्रे यांच्या शिवसमर्थ फिटनेस क्लबचे शानदार उद्घाटन



**दै.रायगड नगरी । बदलापूर**

बदलापूर पूर्व स्टेशन पाडा येथे आंतरराष्ट्रीय शरिरसौष्ठव पट्टू विरेश धोत्रे यांच्या शिवसमर्थ फिटनेस क्लबचे भव्य उद्घाटन आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि ज्येष्ठ प्रशिक्षक, फिटनेस आयकॉन मनिष अडीविलकर, मि.वर्ल्ड सागर कातुर्डे, समीर दाबिलकर, आ.किसन कथोरे, शिवसेना मा.जिल्हाप्रमुख मनोहर आंबवणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी टीम मास मुंबईचे सर्व सदस्य, उपशहरप्रमुख प्रवीण राऊत, उद्योजक अनिल तिवारी, नगरसेविका सौ.उज्वला आंबवणे, सौ.शितल राऊत, सौ.स्वाती धोत्रे, विभागप्रमुख उल्हास आंबवणे, शिवसेना तालुकाप्रमुख बाळा कांबरी, नगरसेवक राजन घोरपडे, संजय भोईर, तुकाराम म्हात्रे, अनिल भगत, मा.नगराध्यक्ष प्रियेश जाधव, सौ.रती पातकर, युवा सेना शहराध्यक्ष रोहन पाटील, पनवेल शेकाप नेते अतुल भगत, मनसे शहराध्यक्ष जयेश कदम, राष्ट्रवादी शहराध्यक्ष कालिदास देशमुख, प्रदीप गीते, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गेली २ वर्षापासून कोरोना काळात फिटनेसबाबत नागरिक जागृत झाले असून आपले स्वास्थ शरीर उत्तम राहण्यासाठी शरिराला आकार देण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यासाठी व्यायामशाळा या महत्वाचे कार्य करीत आहेत. बदलापूर पूर्व रेल्वे स्टेशन जवळ असणाऱ्या या भव्य दुमजली प्रशस्त शिवसमर्थ फिटनेस क्लबमध्ये अत्याधुनिक उपकरणे, साधने असून पुरुष व महिला वर्गासाठी देखील योग्य मार्गदर्शन केले जाईल.

२० ते २२ वर्षे चिकाटीने व्यायाम क्षेत्रात सातत्य ठेवून अनेक शरिरसौष्ठव स्पर्धेमध्ये जिल्हास्तरिय, राज्यस्तरिय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक वेळा मेडल मिळवून बदलापूरचे नाव उंचावणारे विरेश धोत्रे हे शिवसमर्थ व्यायाम शाळेमध्ये स्वतः मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. याचा निश्चितच बदलापूरा-तील तरुण वर्गाला उपयोग होणार असून त्या व्यतिरिक्त इतरही उत्तम प्रशिक्षक मुला-मुलींना मार्गदर्शनासाठी या व्यायाम शाळेत उपलब्ध राहणार आहेत.

# अज्ञात ट्रकच्या धडकेने झालेल्या रिक्षा व दुचाकी अपघातात १ जखमी तर दुसऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२ फेब्रुवारी रोजी १२:१० वाजण्याच्या सुमारास सुमारास फिर्यादी शैलेश ढाकवळ रा.तिलोरे ता.माणगाव हे त्यांचे ताब्यातील रिक्षा क्रं.एम .एच.०६ बी.व्हि. ००५० ही माणगांव बाजुकडून तिलोरे येथे स्वता चालवित घेवुन जात असताना, माणगाव रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे कुलस्वामिनी प्लाझाचे समोर मुंबई गोवा हायवे रोडवर आलेवेळी एक अज्ञात ट्रक वरील चालक याने त्याच्या ताब्यातील ट्रक अविचाराने, हयगयीने, बेदरकारणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवून इंदापुर बाजुकडून माणगांव बाजुकडे जाणारा यांतील संजय केवत याची मोटारसायकल एम.एच.०६ बी.जे.४१४८ हीस पाठीमागुन ठोकर मारून अपघात करून, सदर मोटारसायकल व त्यावरील स्वार संजय केवत हे फिर्यादी शैलेश ढाकवळ यांचे रिक्षावर आदळले.

यामध्ये संजय केवत व शैलेश ढाकवळ यांना लहान मोठया, गंभीर स्वरुपाचे दुखपती झाल्या व दोन्ही वा-हनाचे नुकसान झाले आहे.व संजय केवत यांना गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयातुन उपचाराकरिता मुंबई येथे हलविण्यात आले व काही तासांतच उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. यात अपघातातील अज्ञात ट्रक चालक जखमीला मदत न करता अपघाताची खबर न देता पळुन गेला आहे. यामध्ये अपघातानंतर उपचारा दरम्यान मृत पावलेला मोटारसायकलस्वार संजय केवत हा.काच भंगार, आणि पुठ्ठे यांचा छोटेखानी व्यवसाय करायचा संजय याच्या अश्या अपघाती जाण्याने तिलोरे फाट्याजवळ राहणाऱ्या केवत कुटुंबियांवर दुःखाचे सावट पसरले आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे कॉ गु.र.नं.२९/२०२२ भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८. मोटार वाहन अधिनियम,१९८८ चे कलम १८४,१३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील अधिक तपास माणगाव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक कुंजन जाधव हया करीत आहेत.

# भाजपतर्फे महिलांसाठी हळदीकुंकू

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय प्रजासत्ताक दिन व मकरसंक्रांतीचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीतर्फे मुरुडमध्ये महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील भा.ज.पा. च्या शेगवाडा सुभाषचंद्र बोस मार्गावरील राजयोग बंगला येथे शुक्रवार दि.१८ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वा.ते रात्रौ ८.०० वा. आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महिलांना तीळगुळ, हळदी-कुंकू व सौभाग्य वाण देण्यात येणार आहे.

तरी मुरुड शहरा-तील महिलांनी या हळदीकुंकू समारंभाला आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.असे सुदर्शन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा भा.ज.पा. ज्येष्ठनेते जनार्दन तथा आण्णा कंधारे व सौ. सिमा जनार्दन कंधारे यांनी निमंत्रणाद्वारे कळविले आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत पारगाव

ग्रामपंचायत सिडको अनुदान योजनेंतर्गत सन २०२१-२२ या वर्षाच्या करिता खालीलप्रमाणे विकासकामे करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१५/०२/२०२२ ते दि.२३/०२/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळकतील. सदर निविदा दि.२३/०२/२०२२ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्राामपंचायत पारगाव यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपचांयतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व योजनेचे नाव | निधी | अनामत रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पारगांव गावातील स्मिता चौधरी ते भुषण पाटील यांच्या घरापर्यंत पावसाळी गटारे बांधण्याबाबत. | सिडको अनुदान | ५३९३८५=५३ | २०० | १% | ३ महिने |
| २ | पारगांव गावातील सनी पाटील ते भुषण पाटील यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता व पावसाळी गटारे बांधण्याबाबत. | सिडको अनुदान | ८१०२७९=८१ | २०० | १% | ३ महिने |
| ३ | पारगांव गावातील सलील पाटील ते अनिल पाटील यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता व पावसाळी गटारे बांधणे | सिडको अनुदान | ८२२८२९=५३ | २०० | १% | ३ महिने |
| ४ | पारगांव गावातील दिलकुश दळवी ते सलील पाटील पर्यंत काँक्रीट रस्ता व पावसाळी गटार बांधणे | सिडको अनुदान | ९८६०३३=४८ | २०० | १% | ३ महिने |
| ५ | पारगांव गावातील अनिल पाटील ते भुषण पाटील यांच्या घरापर्यंत पावसाळी गटारे बांधणेबाबत. | सिडको अनुदान | ६०८५३८=५३ | २०० | १% | ३ महिने |
| ६ | पारगांव गावातील मनोज दळवी ते अविनाश पाटील यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता व पावसाळी गटारे बांधणेबाबत. | सिडको अनुदान | ८६९९५६=०९ | २०० | १% | ३ महिने |

टीप :-

१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि.१५/०२/२०२२ ते २३/०२/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय पारगाव येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.

२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी.चे दर संबंधित विभागाची नियमाप्रमाणे लागू राहतील.

३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांति न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

५) सदर कामांच्या निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्तीबाबत कार्यालयात निविदाधारकास माहितीपत्रक देण्यात येईल.

६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदाधारकांस कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

७) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पारगाव**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पारगाव**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बोर्ली - वांजळे रस्त्याच्या दर्जा बाबत प्रश्नचिन्ह

वापरल्याने प्राथमिक स्तराचे डांबरीकरण उखडत आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक वर्षे संघर्षए केला. त्यामुळे रस्त्याच्या कामात होत असएलेला निकृष्ट दर्जाए यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. संपूर्ण काएमाची चौकशी करावी आणि कामाचा दर्जा उच्च राखला जावा, अशी त्यांची मागणी आहे.

आठ दिवसांपूर्वी रस्त्याच्या प्राथमिक स्तराचे डांबरीकरण केले; मात्र डांबराचा वाएपर कमी प्रमाणात केल्याने ते उखडले आहे. नुसत्या हातानेसुद्धा खडी बाजूला करता येत एआहे. प्राथमिक स्तराच्या खाली खडीकरण करणेए आवश्यक आहे; मात्र, डांबरीकरणाच्या खाली एमाती असल्याचे दिसते. सध्याच्या अवस्थेत रस्त्याचा वापर केल्यास संपूर्ण रस्ताच खराब होईलए. त्यामुळे संपूर्ण कामाची तत्काळ चौकशी कएरून झालेल्या कामाचा दर्जा सुधारून काम करावे यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

रस्त्या बाबत माहिती घेण्यासाठी श्रीवर्धएन येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागीय शाखा अभियंएता डोंगरे यांना विचारले असता मी बाहेर आहे, आल्यावर बघेन असे उत्तर दिले. शासनाचे लाखो रुपये रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणावर खर्च होत असताना रस्ते वर्षभर नाही तर सहा महिनेही का टिकाव धरत नाही, हा चौकशीचा विषय आहे.

## महाराष्ट्र बाबतीत योग्य भूमिका घेतली पाहिजे : खा.सुनील तटकरे

महिला भगिनींच्या आरोग्याशी निगडित अन्य बाबतीतही खबरदारी घेण्याचा यशस्वी प्रयत्न करणार असल्याचे खासदार तटकरे यांनी सांगताना अशा वेळी तुमच्या सहकार्याची ताकद मिळावी अशी इच्छा व्यक्त केली. १० लक्ष रुपये खर्चाचे ग्रुप ग्राम साळवींडे नुतन कार्यालयाचे उदघाटन ८.५ रुपये मंजुरी देण्यात आलेल्या अंगणवाडी इमारत आणि जलजीवन मिशन योजने अंतर्गत एक कोटी रुपयांची मंजुरी मिळालेल्या पाणी पुरवठा योजना कामांचे भूमिपूजन खासदार सुनिल तटकरे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस अलिशेट कौचाली, तहसीलदार समीर घारे, गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे, पापु अभियंता युवराज गांगुर्डे, अभियंता डोंगरे, कक्ष अधिकारी गायकवाड, तालुका मुंबई अध्यक्ष महेश शिर्के, जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, पंचायत समिती सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती उज्वला सावंत, माजी सभापती नाझीम हसवारे, जेष्ठ पत्रकार संजय खांबेटे, नगराध्यक्ष असहल कादरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, सरपंच सोनल घोले,उपसरपंच लक्ष्मण कांबळे, बाळकृष्ण गोरणाक, सदस्य महेश घोले आदि ग्रामस्थ महिला मंडळ आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात खासदार सुनिल तटकरे यांनी साळवींडे ग्राम पंचायत कार्यालयाची नव्याने उभारण्यात आलेली वास्तू सुबक आणि सुंदर असल्याची शाबासकी देताना सरपंच सोनल घोले यांनी केलेले भाषण आणि तीन वर्षात तीन कोटींची केलेल्या विकास कामाचे खासदार तटकरे यांनी तोंडभरून कौतुक केले. सुंदर आणिय सुबक कार्यालयाचे वास्तूत काम घेऊन येणारे प्रत्येक नागरिक त्याच पद्धतीने खुष होऊन परतले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. महिला भगिनींना आज राज्यात आणि देशाच्या सामाजिक, राजकिय क्षेत्रात जी संधी उपलब्ध झाली आहे ती सावित्रीबाई, शाहु फुले आंबेडकर यांनी क्रांतिकेल्याने आणि राष्ट्रीयनेते शरदचंद्रजी पवार साहेबांनी ३५%आरक्षणाचा निर्णय घेतल्याचे आवर्जुन उल्लेख केला.श्रीवर्धन मतदार संघात रस्ते विकासाला प्राधान्य दिल्याने पर्यटन विकास, रोजगार निर्मिती होते त्यामुळे प्रत्येक हाताला काम मिळेल. साळवींडे गावाचा विकास झाल्याने महिलांना वेगळ्या प्रकारचा आंनद झाला आहे त्यामुळे रांगोळ्या काढून माझा आगळा वेगळा स्वागत केला हे घडले ते केवळ विकास काम करण्यासाठी प्रचंड प्रमाणात आपल्या पाठीशी शक्ती निर्माण केल्याने शक्य झाले असल्याचे खा.तटकरे यांनी व्यक्त करताना विकास काय असतो ते आता प्रत्यक्ष अनुभवयास मिळत आहे. अनेक मुद्यावर भाष्य करताना खासदार सुनिल तटकरे यांनी आंबेत, संदेरी, खरसई, पाभरे, मेंदडी, वारळ, येथील खारलँडचे एक कोटींच्या कामांना आपण मंजुरी मिळवुन देत असल्याचे सांगितले.नवीन आंबेत पुल मंजुरी देण्यासाठी आणि येथील विकसित रस्ते मार्गी लावण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे. म्हसळा तालुक्यातील सर्वच अधिकारी चांगले काम करीत असल्याची माहिती देताना लोकशाहीच्या माध्यमातून निवडुन आलेले लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकारी परस्परांचे हातात हात घालून ज्या वेळी काम करत असतात तेव्हा आदर्शवत विकास काम होत असतो अशी स्पुष्टी जोडली. अत्यंत देखण्या आणि निटनेटक्या कार्यक्रमात खासदार सुनिल तटकरे यांचे साळवींडे ग्रामस्थांनी ढोलताशांच्या गजरात जंगी स्वागत केले. सभापती बबन मनवे, अलिशेट कौचाली यांनी मनोगत व्यक्त केले. सरपंच सोनल घोले यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक भाषण केले.

# कोप्रोली आरोग्य केंद्र व डी.वाय.पाटील कॉलेजच्या वतीने विंधणे येथे कोविड लसीकरण मोहीम

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील दोन वर्षांपासून जगभरातील अनेक नागरिकांचे बळी घेणाऱ्या व अनेकांना हैराण करून सोडलेल्या कोरोना संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव आत्ता दुसऱ्या लाटेनंतर क्षमू लागला आहे.मात्र अद्याप काही खेड्या-पाड्यातील नागरिकांना या कोरीना संसर्गजन्य विषाणूच्या प्रादुर्भावाचे गंभीर्यच नाही.त्यामुळे सर्वांनी कोरोना प्रतिबंध लसीकरण करावे हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उरण तालुक्यातील एकमेव असलेल्या कोप्रोली आरोग्य केंद्र आणि नवीमुंबई नेरुळ येथील डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेज येथील प्रोफेसर आणि विद्यार्थी,विद्यार्थ्यांनी काल १४ ते १९ फेब्रुवारी २०२२ या पाच दिवसाच्या फिरत्या कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेजच्या प्रोफेसर सारा सनदी, मानसी राहाणे, दया देसाई, डॉ.अनिकेत बोकरे, आरोग्य सहाय्यक अजय पाटील, आरोग्य सेविका हृतिका पाटील, दमयंती ठाकूर,मेघना ठाकूर,आशा वर्कर संगीता जोशी,करुणा घरत आदींनी मेहेनत घेतली.तर या कालच्या पहिल्या दिवशी हे फिरते पथक विंधणे येथील भव्य अशा हनुमान मंदिरात दाखल झाले असून, कालच्या सत्रात योग्य त्या चाचण्या करून ५८ नागरिकांचे कोरोना प्रतिबंधक लसीकरण पूर्ण करण्यात आले.उरलेल्या अन्य दिवसात हे कोरोना प्रतिबंधक फिरते पथक या उरण तालुक्यातील गावागावात दाखल होणार आहे.

अर्जदारातर्फे वकील
अॅड.वर्षा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०३/२०२२

१) श्रीमती.मंगल ईश्वर वाघमारे
वय : ४३, धंदा : गृहिणी
२) कु.ऋतुजा ईश्वर वाघमारे (लग्नाआधी)
सौ.ऋतुजा सुरज काळे (लग्नानंतर)
वय : २३, धंदा : गृहिणी
३) कु.श्वेता ईश्वर वाघामारे
वय : २२, धंदा : शिक्षण
४) कु.प्रिती ईश्वर वाघमारे
वय : १८, धंदा : शिक्षण
रा.फ्लॅट नं.बी १०१, ओम श्री निकेतन
एच.एस.एस.कॉलनी, प्लॉट नं.१२, से.१,
खांदा कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.ईश्वर कल्लाप्पा वाघमारे हे ३/२/२०२१ रोजी फ्लॅट नं.बी १०१ ओम श्री निकेतन, से.१ खांदा कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे कायमचे रहिवासी होते व ते दि.३/२/२०२१ रोजी फ्लॅट नं.बी १०१ ओम श्री निकेतन, से.१, खांदा कॉलनी, न्यू पनवेल, पनवेल, रायगड ४१०२०६ येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी सदर अर्जदार क्र.१ ते क्र.४ यांनी ते कै.ईश्वर कल्लाप्पा वाघमारे यांचे खालील वर्णन केलेल्या सदनिकेत त्यांच्या असलेल्या हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**सदनिकेचे वर्णन**

**मौजे : खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथील प्लॉट नं.बी १०१, प्लॉट नं.१२ ए, सेक्टर १, मधील ओम श्री निकेतन सी.एच.सी. सोसायटी, बिल्डींग मधील पहिला मजला बी विंग मधील सदनिका एकूण ३९० चौ.फुट फ्लॅट + ३३० चौ.फुट टेरेस क्षेत्र (कारपेट क्षेत्र) खांदा कॉलनी न्यू पनवेल, पश्चिम ४१०२०६**

त्याअर्थी अर्जदार क्र.१ ते क्र.४ हे मयत कै.ईश्वर कल्लाप्पा वाघमारे यांचे वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत आज हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत नाही आली तर हे कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.ईश्वर कल्लाप्पा वाघमारे यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१४/२/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब
अॅड.भुषण म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

कै.कान्हा हाशा पारिंगे मयतचे वारस
कै.नारायण कान्हा पारिंगे (मयत मुलगा)
१) श्री.विकास नारायण पारिंगे
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.दिनेश नारायण पारिंगे
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.शिवदास नारायण पारिंगे
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ रा.मु.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.कान्हा हाशा पारिंगे ह्यांचे निधन दि.०६/०९/१९९३ रोजी मु.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाल्याने श्री.विकास नारायण पारिंगे, वगैरे ह्यांनी कै.कान्हा हाशा पारिंगे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वहाळ | ६६+२६२ अ | २२६ | ५ | ०-०३-० | ०.०३ |
| | | ६ | ३ | ०-०१-५ | ०.११ |
| | | ६ | १४ | ०-०९-० | ०.६७ |
| | | १७१ | ३ | ०-०५-६ | ०.५५ |
| | | १७२ | २ | ०-००-१२ | ०.०६ |
| | | ४८३ | ६ | ०-२१-० | ३.९४ |
| | | ४९६ | ४ | ०-०७-० | ०.२२ |
| | | ५०९ | ३ | ०-१२-० | ०.२७ |
| | | ५१५ | ५ | ०-१९-० | ०.४४ |
| | | ४६७ | ५ | ०-०९-० | २.०६ |
| | | २१९ | १० | ०-०६-० | ०.९१ |
| | | ६ | १२ | ०-०५-७ | ०.५३ |
| | | १४१ | ४ | ०-०२-० | ०.२२ |
| वहाळ | ६६+२६२ क | २२१ | १ | ०-०८-० | १.०६ |

वरील संपादीत सामाईक मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.कान्हा हाशा पारिंगे यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड क्रं.४, सेक्टर-२३, क्षेत्र ९५० चौ.मी. हा भूखंड वितरित करण्यात आलेला आहे. श्री.विकास नारायण पारिंगे, वगैरे हे कै. कान्हा हाशा पारिंगे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.विकास नारायण पारिंगे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.कान्हा हाशा पारिंगे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब
अॅड.भुषण म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

कै.सुरेखा एकनाथ म्हात्रे मयतचे वारस
१) श्री.सुरज एकनाथ म्हात्रे
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.नीता प्रकाश म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : हाऊस नं.१०३८, जासई,
वॉटर टँक जवळ, उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सुरेखा एकनाथ म्हात्रे ह्यांचे निधन दि.२८/०५/२०१४ रोजी धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाल्याने श्री.सुरज एकनाथ म्हात्रे वगैरे ह्यांनी कै.सुरेखा एकनाथ म्हात्रे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वहाळ | ६६+२६२ अ | २२६ | ५ | ०-०३-० | ०.०३ |
| | | ६ | ३ | ०-०१-५ | ०.११ |
| | | ६ | १४ | ०-०९-० | ०.६७ |
| | | १७१ | ३ | ०-०५-६ | ०.५५ |
| | | १७२ | २ | ०-००-१२ | ०.०६ |
| | | ४८३ | ६ | ०-२१-० | ३.९४ |
| | | ४९६ | ४ | ०-०७-० | ०.२२ |
| | | ५०९ | ३ | ०-१२-० | ०.२७ |
| | | ५१५ | ५ | ०-१९-० | ०.४४ |
| | | ४६७ | ५ | ०-०९-० | २.०६ |
| | | २१९ | १० | ०-०६-० | ०.९१ |
| | | ६ | १२ | ०-०५-७ | ०.५३ |
| | | १४१ | ४ | ०-०२-० | ०.२२ |
| वहाळ | ६६+२६२ क | २२१ | १ | ०-०८-० | १.०६ |

वरील संपादीत सामाईक मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.सुरेखा एकनाथ म्हात्रे यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड क्रं.४, सेक्टर-२३, क्षेत्र ९५० चौ.मी. हा भूखंड वितरित करण्यात आलेला आहे. श्री.सुरज एकनाथ म्हात्रे वगैरे हे कै.सुरेखा एकनाथ म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.सुरज एकनाथ म्हात्रे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुरेखा एकनाथ म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांतर्गत (वडघर) चिंचपाडा संचिका क्रमांक : CHMO-ICIG-197 मधील पुर्नवसन योजनेनुसार वाटप केलेल्या भूखंडाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| भूखंडाचे ठिकाण | सेक्टर क्रमांक | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| वडघर पुष्पक नोड | R 1 | 38 | 210 |

वरील नमूद भूखंडाचा करारनामा / भाडेपट्टाकरार हा श्री.हसुराम महादू मुंडकर यांचे नावे दि.२५/१०/२०१७ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला होता. सदर भूखंडाची बांधकाम परवानगी सिडकोकडून दिनांक २९/०६/२०१८ रोजी घेतलेली आहे. सदर वरील नमूद भूखंड श्री.तुकाराम महादू मुंडकर यांचे नावे दि.२५/११/२०१९ रोजी विनामोबदला बक्षिसपत्राने पवल-४ दस्त क्रं.-११९९२/२०१९ नुसार, वडघर पुष्पक नोड, सेक्टर क्रं. R 1, भूखंड क्रमांक ३८, क्षेत्र २१० चौ.मी. हा भूखंड श्री.तुकाराम महादू मुंडकर यांचे नावे सिडको दप्तरी नोंदीत झालेला होता. कै.तुकाराम महादू मुंडकर हे दि.५/०३/२०२० रोजी मयत झाल्याने त्यांचे पश्चात दिवाणी चौकशी अर्ज क्रं.५५२/२०२० नुसार १) श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर २) श्री.संदीप तुकाराम मुंडकर ३) श्रीमती.यमुनाबाई तुकाराम मुंडकर ४) सौ. संगीता अरुण परदेशी ५) सौ.गीता लक्ष्मण गावंड ६) सौ.वनिता रोहिदास गोंधळी यांची नावे भूखंडधारक म्हणून सदर भूखंडाचे बाबत सिडको दप्तरी नोंदीत झालेली होती.

सदर भूखंड धारकापैकी श्रीमती.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे दि.२१/०४/२०२१ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे पश्चात दिवाणी चौकशी अर्ज क्रं.१६१४/२०२१ नुसार १) श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर २) श्री.संदीप तुकाराम मुंडकर ३) सौ.संगीता अरुण परदेशी ४) सौ.गीता लक्ष्मण गावंड ५) सौ.वनिता रोहिदास गोंधळी यांनी सदर मयत कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला सिडको दप्तरी सादर केलेला होता. यानुसार मयत यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे नावे कमी झालेले असून सदर भूखंडधारक म्हणून १) श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर २) श्री.संदीप तुकाराम मुंडकर ३) सौ.संगीता अरुण परदेशी ४) सौ.गीता लक्ष्मण गावंड ५) सौ.वनिता रोहिदास गोंधळी यांची नावे सदर भूखंडाचे बाबत सिडको दप्तरी नोंदीत आहेत.

सदर भूखंड हा आमचे अशिल नामे श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर व श्री.संदीप तुकाराम मुंडकर यांना आमचे अशिलांच्या बहिणी सौ.संगीता अरुण परदेशी व सौ.गीता लक्ष्मण गावंड तसेच सौ.वनिता रोहिदास गोंधळी या कायमस्वरुपी विनामोबदला बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर भूखंड मिळकती बाबत सदर भूखंडधारक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीमधील त्यांचा हिस्सा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले भूखंडधारक आमचे अशिलांच्या बहिणी सौ. संगीता अरुण परदेशी, सौ.गीता लक्ष्मण गावंड, सौ.वनिता रोहिदास गोंधळी यांच्या बरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०२/२०२२

**सही/-**
**अॅड.अर्चना आ. म्हस्कर**
**शिवकृपा अपार्टमेंट, सेक्टर १२,**
**कामोठे, नवी मुंबई, रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# शिवसेनेने आयोजित केलेल्या 'व्हॉइस ऑफ पनवेल २०२२' चा आदित्य नीला ठरला विजेता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेचे महानगर संघटक आणि माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी पनवेल शहर शिवसेनेच्या माध्यमातून 'व्हॉईस ऑफ पनवेल' नावाची सुगम संगीत स्पर्धा पनवेल तालुका क्षेत्रातील तरुणांसाठी आयोजित केली होती. या स्पर्धेचा महाअंतिम फेरी चा सोहळा शनिवार १२ फेब्रुवारी रोजी फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखदार पद्धतीने पार पडला.



प्राथमिक फेरीत सव्वाशेहून अधिक स्पर्धक असलेल्या या स्पर्धेतून अंतिम फेरीसाठी सहा स्पर्धक व तीन परफॉर्मर अशा नऊ लोकांची निवड करण्यात आली. निलेश गायकवाड, निमिश वळसंगीकर, उत्कर्ष चंदनशिवे, अक्षता भातणकर, दिव्या अहिरे, आदित्य नीला, प्रशांत ठोंबरे, क्षितीज जाधव अशी अंतिम फेरीतील स्पर्धकांची नावे आहेत. सुप्रसिद्ध संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी हे पूर्ण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी एक गीत सादर केले. याप्रसंगी उपस्थित शिवसे-नेचे मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचा वाढदिवसानिमित्त डॉक्टर गिरीश गुणे यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. एखाद्या लाइव्ह रियलिटी शो प्रमाणे या अंतिम सोहळ्याचे आयोजन प्रथमेश सोमण व त्यांचे पदाधिकारी यांनी केले. डोळे दिपवणारी रोशणाइ, उत्तम स्टेज डेकोरेशन, बाळासाहेब ठाकरे यांचे ८० फुटी पोर्ट्रेट, व दादर शिवतीर्थ येथील स्मृती स्थळाची प्रतिकृतीही साकारण्यात आली होती. सदर स्पर्धेच्या अंतिम फेरीला पनवेलकरांनी हाऊसफुल प्रतिसाद दिला. पुणे येथील मधुरा वेलणकर व पनवेलमधील अनिरुद्ध भिडे यांनी अंतिम फेरीच्या परीक्षणाचे काम पाहिले. अंतिम फेरी तीन टप्प्यांमध्ये घेण्यात आली. स्पर्धा अतिशय रंगतदार झाली. सदर स्पर्धेमध्ये आदित्य नीला हा व्हॉइस ऑफ पनवेल या खीताबाचा मानकरी ठरला तर निमिष वळसंगीकर व निलेश गायकवाड यांना उपविजेते पद देण्यात आले. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे उपस्थित रसिक प्रेक्षकांनी स्वतः आपले मत टाकून चॉईस ऑफ पनवेल या बक्षिसाचीही निवड करण्यात आली. प्रेक्षकांच्या मतांनी विजयी झालेल्या रोनक रामगरीया यास 'चॉईस ऑफ पनवेल' चे बक्षीस देण्यात आले. अत्यंत आकर्षक ट्रॉफी व रोख रक्कम असे बक्षिसांचे स्वरूप होते. या कार्यक्रमात पनवेलमधील नामवंत संगीत शिक्षकांचा मानपत्र देऊन प्रमुख अतिथिं तर्फे सत्कार करण्यात आला. पनवेल मधील सुप्रसिद्ध गानगुरु कै. तळेकर बाई यांच्या नावाने संगीत क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींना विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, ज्येष्ठ संगीतकार सलील कुलकर्णी, रायगड जिल्हा सल्लागार बबन दादा पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, शिवसेनेचे स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण, सल्लागार शिरीष बुटाला, शहर प्रमुख प्रवीण जाधव यांसह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत ग्लॅमरस आणि ग्रँड स्वरूपात आयोजित केलेली ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संकल्पना व संयोजक असणारे महानगर संघटक प्रथमेश सोमण यांच्या सोबत अच्युत मनोरे, राहुल गोगटे, अनिल कुरुघोडे, सुजन मुसलोंडकर, अर्चना कुलकर्णी, अभिजीत साखरे, प्रसाद सोनावणे, अर्जुन परदेशी, प्रदीप माखीजा व आमचे आम्हीच नाट्यसंस्थेचे सर्व कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

# कळंबुसरे येथे प्रथम शिक्षण संस्थेने राबविली ग्राम शिक्षा केंद्राची संकल्पना

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कळंबुसरे येथे प्रथम शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्राम शिक्षा केंद्र सुरू करण्यात आले आहे.या ग्रामशिक्षा केंद्राचे उदघाटन या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी पंचायत समितीच्या वरिष्ठ विस्तार अधिकारी प्रियंका म्हात्रे साधन व्यक्ती वैशाली गावंड यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी अक्षर दिंडी ही काढण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी ग्रामसेवीका स्वाती म्हात्रे,सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र पाटील,सचिन तांडेल मेमोरियल चे सदस्य शिक्षक समीर म्हात्रे, सचिन पाटील, प्राथमिक शाळेचे शिक्षक नवाले, रुपाली पाटील, अंगणवाडी सेविका रेश्मा गायकवाड, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष शिक्षक, प्रथम शिक्षण उरण ब्लॉक चे डीआरएल प्रतीक खुंटे, रणिता ठाकूर, काशिराम निरगुडे, संतोष दळवी, सुनिता म्हात्रे, माता पालक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

या ग्राम शिक्षा केंद्रासाठी सारडे विकास मंच सचिन तांडेल मेमोरियल संस्था तसेच अन्य संस्था कडून मिळून ५०० पुस्तके, ग्रामसेवकांकडून १५० पुस्तेके अशा विविध प्रकारची ग्राम शिक्षा केंद्रासाठी देण्यात आली. या पुढे मोठे वाचनालय कसे तयार होईल या साठी सामाजिक संस्था अग्रेसर असणार आहेत.तसेच या वाचनालयाची संपूर्ण जबाबदारी शिक्षक समीर म्हात्रे यांनी घेतली आहे. तसेच काही दिवसात गावातील नागरिकांच्या मदतीने अक्षर भिंती निर्माण करणार असल्याने त्यानी सांगितले.तसेच कोरोनाच्या काळात ग्राम शिक्षा केंद्र ही संकल्पना शिक्षणाला वेगळे आधार स्तंभ देणारी संकल्पना गावकऱ्यांना आवडली असून ही संकल्पना राबविल्या बद्दल प्रथम शिक्षण संस्थेचे आभार मानले आहेत.

# हितवर्धक जोहे क्रिकेट सामन्यांत कळवे संघ अंतिम विजेताचा आदित्य नीला ठरला विजेता

**दै.रायगड नगरी । पेण**

हितवर्धक क्रिकेट क्लब जोहे आयोजित भव्य टेनिस क्रिकेट सामन्यांत गावदेवी कळवे संघ अंतिम विजेता ठरला, तर साई संघाने द्वितीय व ईरवाडी संघ तृतीय क्रमांकाचा विजेता ठरला.



यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्ष नेते वैकुंठ पाटील, मनसे तालुका अध्यक्ष रुपेश पाटील, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, माजी सरपंच काशिनाथ पाटील, सदस्य गोपीनाथ मोकल, उद्योजक हर्षल पितळे, दीपक मोकल, दिगंबर नागे, रुपेश पाटील, संतोष मोकल, सुनिल पाटील, रवींद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. गोविर्लेच्या भव्य मैदानावर झालेल्या या स्पर्धेत ओपनच्या सोळा संघांनी व चाळीस पेक्षा वय जास्त असलेल्या आठ संघांनी सहभाग घेतला होता. अतिशय चुरशीच्या झालेल्या लढतींमध्ये गावदेवी कळवे संघाने सर्वांवर मात करत अंतिम सामन्यांत प्रवेश केला. अंतिम सामना साई व कळवे संघात अतिशय चुरशीचा झाला. या भव्य टेनिस क्रिकेट सामन्यांत गावदेवी कळवे संघ अंतिम विजेता ठरला, तर साई संघाने द्वितीय व ईरवाडी संघ तृतीय क्रमांकाचा विजेता ठरला. सामन्यांतील मालिकाविर म्हणून कळवे गावातील अष्टपैलू खेळाडू सुशांत मोकल ठरला. उपस्थित खेळाडूंना वैकुंठ पाटील व काशिनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. या सामन्यांसाठी हितवर्धक संघाचे नारायण म्हात्रे, विनोद म्हात्रे, वैभव धुमाळ, रवींद्र रसाळ, कैलास घरत, दीपेश पाटील, नवनाथ घरत, रुपेश पाटील, निनाद धुमाळ, ललित पाटील, हिमांशू पाटील, सार्थक म्हात्रे व सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड
जा.क्र.२२७/२०२२/न्यायशाखा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग, जि.रायगड
दि.११/०२/२०२२

## चौकशीची जाहीर नोटीस

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक : ४०४/२०२१
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : SPRINGS OF LIFE CHRISTIAN FELLOWSHIP CENTRE (SLCFC) जि.रायगड
...बाबत
श्री.Vailiparambil Abraham Isac अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम ५०००/- रुपये is in custody with the treasurer Mr.Biju Thomas

ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग यांचे शिक्क्यानिशी आज दि.११/०२/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**(श्रीम.अंजली रमेश पिसाळ)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

---

राव साहेब

अर्जदार यांचे वकील
ॲड.निलम भोसले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

१) श्रीमती.कमळू अंबाजी भगत
वय : ५१ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) कु.रेश्मा अंबाजी भगत
वय : २२ वर्षे, धंदा : गृहिणी
३) सौ.पार्वती अंबाजी भगत
वय : २१ वर्षे, धंदा : गृहिणी
४) कु.संतोष अंबाजी भगत
वय : १८ वर्षे, धंदा : विद्यार्थी
५) कु.कैलास अंबाजी भगत
वय : १५ वर्षे, धंदा : विद्यार्थी
वरील सर्व रा.कोळीवाडा, कोळेश्वर मंदिर जवळ,
पनवेल, रायगड, महाराष्ट्र, पनवेल-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

१) तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै. अंबाजी नामदेव भगत यांचे दि.०५/०६/२०१४ रोजी घर कोळीवाडा, पनवेल येथे निधन झाले. यांच्या मालकीची व ताबे कब्जातील मिळकती कै. अंबाजी नामदेव भगत यांचया मालकीची व ताबे कब्जातील मिळकती १) मौजे : पनवेल, कोळीवाडा, मिळकत नं.१२२९/०७ आणि ०९, कोळेश्वर मंदिर जवळ, पनवेल, ता.पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६ २) मौजे : वडघर व करंजाडे येथील मिळकत क्र.७५३, ७५४, ७५५, ७५६ आणि ६८३ ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या निवासी सदनिका ह्या मिळकती आहेत. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**

**१) मौजे : पनवेल, कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | घर मिळकत नं. जुना/नवीन | एकूण क्षेत्र | मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|
| पनवेल-कोळीवाडा | १२२९/०७ आणि ०९ | १४०.५० चौ.फुट | आर.सी.सी. घर |

**२) मौजे : वडघर-करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | घर मिळकत नं. | एकूण क्षेत्र | मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|
| वडघर | ७५३ | २०० चौ.फुट | विटा सिमेंट पत्रा घर |
| वडघर | ७५४ | २०० चौ.फुट | विटा सिमेंट पत्रा घर |
| वडघर | ७५५ | २०० चौ.फुट | विटा सिमेंट पत्रा घर |
| वडघर | ७५६ | २०० चौ.फुट | विटा सिमेंट कौलारु घर |
| वडघर | ६८३ | २०० चौ.फुट | विटा सिमेंट कौलारु घर |

१) वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.अंबाजी नामदेव भगत यांच्या मालकीची व ताबे कब्जातील आहेत. कै.अंबाजी नामदेव भगत यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.अंबाजी नामदेव भगत यांना अर्जदार हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय १) श्रीमती.कमळू अंबाजी भगत, २) कु.रेश्मा अंबाजी भगत, ३) सौ.पार्वती अंबाजी भगत, ४) कु.संतोष अंबाजी भगत, ५) कु.कैलास अंबाजी भगत हे कै.अंबाजी नामदेव भगत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मुजावर साहेब कोर्ट

ॲड.माधुरी चतारे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व/क स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५४/२०२२
ने.ता.२५/०४/२०२२

१) श्रीमती.तबारकुन्निशा सादिक अली खान
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.फातिमा जमील खान
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
३) जुनैद जमील खान
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
४) शाहिन जमील खान
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
५) अयान जमील खान
वय : ०९ वर्षे, धंदा : शिक्षण
(अर्जदार नं.१ स्वतःकरिता व अर्जदार नं. ४ व ५ यांची अ.पा.क.आई म्हणून)
सर्व रा.फ्लॅट नं.२०३, दुसरा मजला, एफ विंग,
गावदेवी गार्डन, सर्व्हे नं.५७, हिस्सा नं.२ सी,
मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.जमील सादिक अली खाान हे दि.०५/०६/२०२१ रोजी वेदांत हॉस्पिटल घोडबंदर रोड ठाणे येथे मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत जमील सादिक अली खान यांचे नावावर खालील स्थावर मिळकती असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ) सदनिका क्रं.२०३, दुसरा मजला, एफ विंग, गावदेवी गार्डन, सर्वे नं.५७, हिस्सा नं.२ सी, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ३८३ चौ.फुट (चटई) व जोडून गच्ची ५० चौ.फुट, सदर सदनिका कै.जमील सादिक अली खान यांनी त्यांचे हयातीत दि.१३/०२/२०१४ रोजीचे ''ॲग्रीमेन्ट फॉर सेल'' या कराराने मे.गावदेवी सीवील कनस्ट्रक्शन यांचेकडून रक्कम रुपये १४,१३,०००/- एवढ्या किंमतीत खरेदी केलेली असून सदरचा ''ॲग्रीमेन्ट फॉर सेल'' चा दस्त मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्त क्रं. पवल ४-१८०२/२०१४ अन्वये नोंदविला आहे.

तसेच सदर सदनिकेचे चुक दुरुस्तीपत्र दिनांक १५/०३/२०१४ रोजी मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्त क्रं.पवल ४-३०६६/२०१४ अन्वये नोंदविला आहे.

ब) गाळा-युनिट क्रं.३९, अप्पर ग्राऊंड फ्लोअर, हाँग काँग आर्केड, प्लॉट नं.०४, रोड नं.१७, सेक्टर १९, नवीन पनवेल (पु.), नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ८८.५ चौ.फुट (चटई) सदर गाळा कै.जमील सादिक अली खान यांनी त्यांचे हयातीत दि.०९/११/२०१५ रोजीचे ''सेल डीड'' या कराराने श्रीमती.राजी राजन नायर यांचेकडून रक्कम रुपये ७,००,०००/- एवढ्या किंमतीत खरेदी केलेला असून सदरचा ''सेल डीड'' चा दस्त मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्त क्रं.पवल ४-१४२९४/२०१५ अन्वये नोंदविला आहे.

**क) मौजे : उमरोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | भू-धारण पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| २३/१ | भोगवटादार वर्ग-१ | ०-५२-०० पो.ख. ०-०४-०० एकूण ०-५६-०० | ४.०६ |
| एकूण मिळकती पैकी विकत घेतलेले क्षेत्र | | ०-१६-०० | |

सदर शेतजमीन मिळकत कै.जमील सादिक अली खान यांनी त्यांचे हयातीत श्री.बंसराज सुर्यबली यादव यांचे सोबत असे दोघांनी मिळून एकत्रित दि.०५/०७/२०१९ रोजीचे ''खरेदीखत'' या कराराने श्री.चंद्रकांत नामदेव मढवी यांचेकडून एकूण रक्कम रुपये ३०,५०,०००/- एवढ्या किंमतीत खरेदी केलेली असून सदरचा ''खरेदीखत'' हा दस्त मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्त क्रं.पवल २-८४८४/२०१९ अन्वये नोंदविला आहे. सबब सदर दस्ताद्वारे कै.जमील सादिक अली खान व श्री.बंसराज सुर्यबली यादव सदर शेतजमीन मिळकतीचे संयुक्त मालक झालेले आहेत.

सदर सदनिका / मिळकती सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.जमील सादिक अली खाान यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१४ माहे २१, सन २०२२ रोजी मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व/क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व/क.स्तर, पनवेल**

---

Adv. Yogendra Pratap Singh

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (S. D.), THANE
CIVIL M.A. NO. 1894 OF 2021
Exhibit No. 5

**1. Mrs. Anita Anand**
wife of late Shri Yogesh Anand, age about 66 years, Occ: House-wife, Hindu, presently residing at 10/901, Seawoods Estates Ltd., NRI Complex, Palm Beach Road, near Delhi Public School, Sector-54, 56 & 58 ,Nerul, Navi Mumbai-400706.
**2. Mr. Dheeraj Anand**
Son of late Shri Yogesh Anand, age about 42years, Occ: service, Hindu, presently Residing at 10/901, Seawoods Estates Ltd. NRI Complex, Palm Beach Road, near Delhi Public School, Sector-54, 56 & 58, Nerul, Navi Mumbai-400706. Represented through Power Of Attorney (POA) Holder Mrs. Anita Anand.
**3. Ms. Nupur Anand**
Daughter of late Shri Yogesh Anand, age about 35 years, Occ: Service, Hindu, presently residing at 10/901, Seawoods Estates Ltd., NRI Complex Palm Beach Road, near Delhi Public School, Sector-54, 56 & 58,Nerul, Navi Mumbai- 400706. Represented through Power of Attorney (POA) holder Mrs. Anita Anand.
Applicants
Versus
Nil

That the husband of Applicant No. 1 and father of Applicant No. 2 & 3 Shri Yogesh Anand died intestate on 22/04/2010 at Nerul, Navi Mumbai and the above named Applicants have filed the present Misc. Application for grant of Heirship Certificate u/s 1 chapter I of the Bombay Regulation Act VIII of 1872 in the court of Civil Judge (S.D.), Thane for the property mentioned in the Schedule herein below:

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**(I)**

Flat No. 501 admeasuring 103.4 Sqr. Mtr. in the Building No. 10 along with one open Car Parking admeasuring 40 Sqr. Ft. in the Seawoods Estates Ltd., NRI Complex, Phase-I, situated at Sector-54, 56 & 58, Nerul, Navi Mumbai, Tal. & Dist. Thane.

(Value of the said flat is Rs. 60,00,000/-(Rupees Sixty Lakh Only). However, since the deceased had One-third Share in the said flat, in so far as this flat is concerned, the suit is valued as Rs. 20,00,000/- (Rupees Twenty Lakh Only)).

**(II)**

Flat No. 901 admeasuring 103.4 Sqr. Mtr. in the Building No. 10 along with one Car Parking admeasuring 40 Sqr. Ft. in the Building No. 10 in the Seawoods Estates Ltd., NRI Complex, Phase-I, situated at Sector-54, 56 & 58, Nerul, Navi Mumbai, Tal. & Dist. Thane.

(Value of the said flat is Rs. 20,00,000/-(Rupees Twenty Lakhs -Only). However, since the deceased had One-third Share in the said flat, in so far as this flat is concerned the suit is valued as Rs. 6,66,667/- (Rupees Six Lakh Sixty-six Thousand Six Hundred Sixty-seven Only)

You the members of public are hereby given notice to appear in the Court of Civil Judge (S.D.) Thane, in person or by pleader duly instructed for filing your statement/objections, if any within 30 days from the date of publication of this notice. Failing which, the said Application shall be heard presuming that there is no objection from anybody and the Application shall be finally decided.

Given under the hand and seal of the Court at Thane on this day of February 2022.

Sd/- Clerk Civil Judge (S.D.) Thane — Court Seal — Sd/- Asst.Superitent. Civil Judge (S.D.) Thane

---

राव साहेब

ॲड.भुषण म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

कै.तुकाराम हाश्या पारिंगे मयतचे वारास
१) श्री.भरत तुकाराम पारिंगे
वय : ७४ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.शिमगा तुकाराम पारिंगे
वय : ७८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.गोपाळ तुकाराम पारिंगे
वय : ६९ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.केसरीनाथ तुकाराम पारिंगे
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.रघुनाथ तुकाराम पारिंगे
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
६) श्री.यादव तुकाराम पारिंगे
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
७) कै.कुंदा कान्हा घरत मयताचे वारस
७/१) कै.रत्नाकर कान्हा घरत
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
७/२) कै.यसवंत कान्हा घरत मयताचे वारस
७/२/१) श्रीम.यशोदा यसवंत घरत
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
७/२/२) कु.जिज्ञासा यसवंत घरत तर्फे अ.पा.कर्ता
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
आई श्रीम.यशोदा यसवंत घरत
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
१ ते ७ रा.मु.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
८) श्रीम.अनुसया चंद्रकांत पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.रांजणपाडा, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीम.राजुबाई नारायण पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.साई प्रतिक अपार्टमेंट, रुम नं.२०३,
बी-विंग, मार्केट यार्ड, ता.पनवेल, जि.रायगड
१०) कै.शांताराम तुकाराम पारिंगे मयताचे वारस
१०/१) श्रीम.चांगुणा शांताराम पारिंगे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
१०/२) श्री.नितीन शांताराम पारिंगे
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
१०/३) श्री.वंदना शांताराम पारिंगे
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
१०/४) कु.सागर शांताराम पारिंगे
वय : २७ वर्षे, धंदा : शेती
१०/१ ते १०/४ रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. तुकाराम हाश्या पारिंगे ह्यांचे निधन दि.१०/१०/२००२ रोजी वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाल्याने श्री.भरत तुकाराम पारिंगे, वगैरे ह्यांनी कै.तुकाराम हाश्या पारिंगे यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वहाळ | ६६+२६२ अ | २२६ | ५ | ०-०३-० | ०.०३ |
| | | ६ | ३ | ०-०१-५ | ०.११ |
| | | ६ | १४ | ०-०९-० | ०.६७ |
| | | १७१ | ३ | ०-०५-६ | ०.५५ |
| | | १७२ | २ | ०-००-१२ | ०.०६ |
| | | ४८३ | ६ | ०-२१-० | ३.९४ |
| | | ४९६ | ४ | ०-०७-० | ०.२२ |
| | | ५०९ | ३ | ०-१२-० | ०.२७ |
| | | ५१५ | ५ | ०-१९-० | ०.४४ |
| | | ४६७ | ५ | ०-०९-० | २.०६ |
| | | २१९ | १० | ०-०६-० | ०.९१ |
| | | ६ | १२ | ०-०५-७ | ०.५३ |
| | | १४१ | ४ | ०-०२-० | ०.२२ |
| वहाळ | ६६+२६२ क | २२१ | १ | ०-०८-० | १.०६ |
| वहाळ | ६६+२६२ ब | २१८ | १ | ०-०८-० | १.१२ |

वरील संपादीत सामाईक मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.तुकाराम हाश्या पारिंगे यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड क्रं.४, सेक्टर-२३, क्षेत्र ९५० चौ.मी. तसेच भूखंड नं...., सेक्टर-२३, क्षेत्र ४० चौ.मी. हा भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.भरत तुकाराम पारिंगे वगैरे हे कै.तुकाराम हाश्या पारिंगे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.भरत तुकाराम पारिंगे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.तुकाराम हाश्या पारिंगे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## माणगांवात क्रिकेट सुनामी वाकडाई चषक सामन्यांची रंगतदार सुरुवात



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

सध्या माणगांवात क्रिकेटचे जोरदार वारे वाहत असुन मर्यादित क्रिकेट सामन्यांची जणु काही सुनामी पाहावयास मिळत आहे. क्रिकेट खेळाडुं मध्ये जोरदार उत्साह संचारला असुन क्रिकेट रसिकांची शनिवार रविवार व अंतिम सामने पाहण्यासाठी गर्दी होत आहे. अशातच मंगु स्टार क्रिकेट क्लब तर्फे ओव्हरआर्म मर्यादित षटकांचे वाकडाई चषक २०२२ क्रिकेट सामने शुक्रवार दि. ११ ते सोमवार दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता तीन बत्ती नाका रेस्ट हाऊस समोर खेळविण्यात येत आहेत.

या सामन्यातील विजेत्या प्रथम क्रमांक संघास रुपये ५०,०००/- तर द्वितीय क्रमांकास ३०,०००/- , तृतिय क्र. २०,०००/- , व चतुर्थ क्रमांकास १०,०००/- अशी बक्षिस मिळणार आहेत. या रंगतदार वाकडाई चषक स्पर्धे चे उदघाटन माणगांव साई दिंडी पालखी मंडळाचे अध्यक्ष संतोष खडतर यांचे शुभहस्ते शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले.

यावेळी मंगु स्टार क्रिकेट क्लबचे अध्यक्ष मंगु जाधव सदस्य व पदाधिकारी यांनी उदघाटक संतोष खडतर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मा. ता. पत्रकार संघटनेचे अध्यक्ष कुवेसकर , उतेखोलचे माजी क्रिकेटपटू अविनाश पाटील तसेच इतर क्रिकेट खेळाडु उपस्थित होते. स्पर्धेतील पहिला सामना सकाळी बरोबर नऊ वाजता सुरु झाला.

या सामन्यांसाठी माणगांवचे शिवसेना नेते राजीव साबळे, नवनिर्वाचीत उप नगरा-ध्यक्ष सचिन बोंबले, भाजपचे नेते अप्पा ढवळे यांनी विशेष शुभेच्छा दिल्या असुन या चार दिवसीय स्पर्धे दरम्यान क्रिकेट सामने पाहण्यासाठी नगर पंचायतचे सर्व नवनिर्वाचीत नगरसेवक हजेरी लावणार आहेत.

बक्षिस वितरणाचा कार्यक्रम ही याच मान्यवरांचे शुभहस्ते पार पाडणार असल्याचे क्रिकेट क्लब अध्यक्ष मंगु जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# ...तर मुख्याधिकारी हटाव, खोपोली बचाव!

## कार्यालय अधीक्षक व उप मुख्याधिकारी यांच्यासोबत चर्चेनंतर आंदोलन मागे

**दै.रायगड नगरी । खोपोली**

अवैध बांधकामांसह विविध १५ विषयांना वाचा फोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते महेश काजळे यांच्या नेतृत्वाखाली 'आम्ही खोपोलीकर आमचं ठरवलं' संघटनेच्या माध्यमातून आज 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी खोपोली नगर परिषदेसमोर आमरण उपोषण करण्यात आले. यावेळी मागील काही महिन्यांपासून खोपोली शहराच्या विकासाला खिळ लागली असून जर लवकरात लवकर प्रशासक या नात्याने मुख्याधिकारी यांनी निर्णय घेतले नाहीत, तर खोपोलीकरांच्या भल्यासाठी 'मुख्याधिकारी हटाव, खोपोली बचाव' मोहीम छेडण्यात येईल, असा इशारा खोपोलीकर तथा काँग्रेस शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांनी दिला.



अनधिकृत बांधकामाची यादी, सर्वे नंबर व विकासकांच्या नावासह त्यांची माहिती स्वतंत्ररीत्या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याचे दुय्यम निबंधक यांच्याकडे देण्याचा स्पष्ट उल्लेख असताना सुध्दा अजुन त्याबाबत निर्णय नाहीखोपोलीकर जे पाणी पीत आहेत त्याचे जे स्तोत्र आहे शंकर मंदिर तलाव त्यामध्ये सेफ्टिक टँकचे जे पाणी येत आहे त्यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्यात याव्यातखोपोली नगर परिषद हद्दीत आता झालेले रस्ते यांची दुरावस्था झाली असून त्याची सखोल चौकशी करून ठेकेदारांचे बिल न काढता पुन्हा त्याच वर्क ऑर्डर, करारनामा त्याच पैशातून संपूर्ण काम महाराष्ट्र शासन परिपत्रक प्रमाणे दर्जेदार करून घेण्यात यावे.खोपोली नगरपरिषदेचे नाट्यगृह याची जी दुरवस्था झाली आहे, त्याची तात्काळ दुरुस्ती व सुधारणा करून नाट्यप्रयोग, सभा व इतर कामासाठी ते उपयोगात आणावेखोपोली नगर परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयामध्ये कंत्राटी, करारनामा बेसेसवर डॉक्टर बाहेरून येणारे व्हिजींटग डॉक्टर, एक्स-रे मशीन, मनुष्यबळ पुरवठा (सिस्टर, कमाऊंटर, वॉर्ड बॉय व इतर) यासंबंधी व इतर जे जे वेगवेगळे ठराव, करारनामा, वर्क ऑर्डर आहेत त्याची माहिती अवलोकन प्रत देण्यात यावी.

खोपोली नगर परिषद हॉस्पिटलमध्ये सोई, सुविधा व इतर हॉस्पिटल तसेच मदत करणाऱ्या संस्था यांची माहिती फलकावर लावावी शहरा-तील अनेक भागात धनदांडग्यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामांना बेकायदेशीर बांधकाम शास्ती लावणेबाबत (पत्रकार - किशोर साळुंके) खालची खोपोली येथे खोपोली नगरपरिषद जागेत भाडेतत्त्वावर दिलेल्या एस्सार पेट्रोल पंपाबाबत करारनामा तसेच किती भाडे जमा झाले ह्याची माहिती उपलब्ध करावी यासह विविध मागण्यांसाठी 'आम्ही खोपोलीकर आमचं ठरलंय' या संघटनेच्या वतीने सोमवार दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी खोपोली नगर परिषदेसमोर आमरण उपोषण केले.

या उपोषणाला काँग्रेस, भाजपसह खोपोलीकरांचा मोठा पाठींबा मिळाला. खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे 'लोकशाही दिना'त सहभागी होण्यासाठी मुंबईला गेल्याने त्यांच्या वतीने आंदोलकांची खोपोली नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक गणेश साळवी व उप मुख्याधिकारी गौतम भगळे यांनी भेट घेवून दि. २० फेब्रुवारीपर्यंत सर्वच विषयांबाबत सखोल माहिती देवून कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन आंदोलकांना देण्यात आल्यानंतर महेश काजळे व टीमने उषोषण मागे घेतले.

# शिवसेना पनवेल शहर शाखेतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पीर करमअली शहा दर्ग्याच्या उर्सानिमित्त पनवेल शहर शिवसेना वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबन पाटील व महानगर संघटक ॲड.प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या हस्ते करण्यात आले.



शिवसेना पनवेल उपशहर संघटक अबरार मास्टर कच्छी, कट्टर शिवसैनिक जमील भाई खान, विभाग क्रमांक १४ उपविभाग संघटक जुनेद पवार, विभाग क्रमांक १४ उपविभाग प्रमुख सुफियान मुकादम, विभाग क्रमांक १४ साईनगर शाखाप्रमुख नुरुल्लह वाईकर, यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. सुश्रुषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रक्त तपासणी, शुगर टेस्ट, सीबीसी, ईसीजी, पल्, एक्स रे, वजन तपासणी यासारख्या तपासण्या करण्यात आल्या. या आरोग्य शिबिरात ५००हुन अधिक लोकांनी लाभ घेतला. या आरोग्य शिबिराचे उदघाटन शिवसेनेचे सल्लागार बबनदादा पाटील व महानगर संघटक प्रथमेश सोमण यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच या आरोग्य शिबिरास खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट दिली तसेच पनवेल शहरातील पिर करमअली शहा दर्ग्याच्या उर्सामध्ये जाऊन आशीर्वाद घेतले. या रक्तदान शिबिरास डॉ. राजेंद्र क्षीरसागर, डॉ. रेश्मा शेख, नर्स साक्षी पाटील, लॅब टेक्निशियन ईश्वरी कल्याणकर आदींनी विशेष मेहनत घेतली. सदर शिबिरास शिवसेना पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, माजी नगरसवेक लतीफभाई शेख, माजी उपशहर संघटक बाबुभाई, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# म्हसळा तालुक्यात शिवसेनेला पक्षांतराचे धक्के



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्हा खासदार सुनिल तटकरे यांच्या विकास कामाला प्रेरीत होऊन कालच म्हसळा तालुक्यातील तोराडी ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असताना आज शिवसेना माजी तालुका प्रमुख तथा माजी सभापती महादेव पाटील यांनी खारगाव खुर्द ग्राम पंचायत सदस्य त्यांचे चिरंजीव ॲड मुकेश पाटील यांच्या समावेत सुतारवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

श्रीवर्धन मतदार संघात शिवसेनेला एका पाठोपाठ एक असे पक्षांतराचे धक्के मिळताना दिसत आहेत.खासदार सुनिल तटकरे यांनी माजी सभापती महादेव पाटील आणि ॲड मुकेश पाटील यांचे स्वागत केले. महादेव पाटील यांच्या अचानकपणे झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमाला प्रदेश चिटणीस अलिशेट कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा परिषदेचे सभापती बबन मनवे, पंस.उपसभापती संदीप चाचले, तालुका युवक अध्यक्ष फैसल गीते,जमीर नजीर, माजी सभापती उज्वला सावंत, मनोहर पाटील उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात महादेव पाटील यांचा पुनरप्र-वेश असुन त्यांनी सुरवातीला राष्ट्रवादी पक्षाचे तालुका अध्यक्ष, तालुका पंचायत समिती सभापती म्हणून चांगले काम केले आहे. राष्ट्रवादी पक्ष कार्यकर्त्यांची जवळीकता आणि खासदार, आमदार, पालकमंत्री मतदारसंघात करीत असलेल्या विकासाला आपण प्रेरित होऊन पक्ष प्रवेश केला असल्याचे महादेव पाटील यांनी संवाद करताना सांगितले.

राजकीय क्षेत्रात जनसेवा करताना वेळोवेळी आपल्यावर अन्याय होत गेला त्यामुळेच आपल्याला पक्षांतर करण्याची वेळ आली होती. गेली अनेक वर्षे शिवसेनेच्या माध्यमातून विकास खुंटला असल्याने विकास कामे करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, शेतकरी १) श्री.शेहनाज अब्दुल्ला पटेल, २) श्री.सोएब अब्दुल्ला पटेल, ३) श्री.सौबान अब्दुल्ला पटेल, ४) श्री.सुफियान अब्दुल्ला पटेल, ५) श्रीमती.सुमिय्या जमीर पटेल, रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड यांना सिडको लि.कडून मौजे : नोड तळोजा, नवी मुंबई येथील फाईल नं.५५८ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल आर डी असोसिएटस तर्फे भागीदार १) श्री.संतोष आर.पांडे २) श्री.रामआशिष डी पांडे रा.ऑफिस ५०६/५०७, डिस्मा कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२४६, के डब्ल्यू सि, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ यांनी हस्तांतरण करण्याचे विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक ५५८ (तळोजा नोड)**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | २३ | ९२ | ३९९.७५ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई-१२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



मा.गोडसे सो।

ॲड.मिरा ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०३/२०२२

१) श्रीमती.प्रतिभा लक्ष्मण कुळसंगे
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अ) कुमारी लक्ष्मी लक्ष्मण कुळसंगे
वय : १४ वर्षे, विद्यार्थी
ब) कुमार गिरीधर लक्ष्मण कुळसंगे
वय १३ वर्षे, विद्यार्थी — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. लक्ष्मण नथुजी कुळसंगे हे दि.१२/०६/२०२० रोजी त्यांच्या राहत्या घरे म्हणजे सदनिका क्र.रा.सदनिका क्र.६०३, एल २ सी कृपासिंधू को.हौ.सो. लि., सहकार नगर, गणेश मंदिर जवळ, म्हाडा कॉलनील, व्ही.टी.सी. कुर्ला जिल्हा मुंबई ४०००२४ मयत झाल्याने त्यांची सिडकोद्वारा मिळालेली मिळकत म्हणजे तळोजा सेक्टर २७ पनवेल तालुका नवीन मुंबई येथे खालीलप्रमाणे अलॉटमेंट झालेली आहे व सदर सदनिकेच्या मोबदल्याची पूर्ण रक्कम सिडको कार्यालयात जमा केलेली आहे.

| इमारत क्र. | मजला | अपार्टमेंट क्र. | क्षेत्रफळ | मुल्यांकन (रुपये) |
|---|---|---|---|---|
| एल ०८ | आठवा | ०८०१ | २९.८२ स्क्वे.मी. | २६,१५,६४९.९९ |

वरील अर्जदार यांनी कै.लक्ष्मण नथुजी कुळसंगे यांच्या १/३ हिश्श्यातील वरील प्रमाणे असलेल्या दोन्ही सदनिकेत यापुढे वरील अर्जदारांचा प्रत्येकी १/३ हिस्सा मिळावा व त्याप्रमाणे त्यांच्या नावे वारस दाखला मिळण्यासाठी या मे.न्यायालयात अर्ज दिलेला आहे.

तरी सदरचे तिनही अर्जदार हे कै.लक्ष्मण नथुजी कुळसंगे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपली हरकत दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारासांचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.इंदलकर सो. यांचे कोर्ट

ॲड.महेश जे. पाटील
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१५३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०३/२०२२

श्री.पांडुरंग गोपाळ कडव — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत चिखले तर्फे
मा.ग्रामसेवक सो। — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.जानकी बाळ्या कडव हे अर्जदार यांचे नात्याने आजी असून ते दि.०९/११/१९५९ रोजी मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.पांडुरंग गोपाळ कडव यांनी जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.जानकी बाळ्या कडव यांच्या मृत्यूची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.जानकी बाळ्या कडव यांच्या मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.१४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी आमच्या अशिल श्री.राम नारायण मुंडकर, राहणार : मु.जुई, पो.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी पुढे सविस्तर वर्णन केलेल्या भूखंडाबाबत श्री.गणेश नारायण मुंडकर, श्री.लक्ष्मण नारायण मुंडकर, श्री.नंदकुमार अनंत मुंडकर, श्री.सुरेंद्र चाहू पाटील आणि सिडको लिमिटेड वगैरे यांच्या विरुद्ध पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. यांचे कोर्टात स्पेशल मुकदमा क्र.१११/२०१९ अन्वये ठरावाकरिता, वाटपाकरिता, दावा भूखंडामधील हिस्सा वेगळा करून मिळण्याकरिता तसेच तुर्तातुर्तीचे व निरंतर मनाई हुकूमाकरिता दावा दाखल केलेला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**प्रलंबित दाव्याचा विषय असलेल्या भूखंडाचे वर्णन**
**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**सिडको संचिका क्र.WAG-ICOGD-166 N**

| नोड | सेक्टर नंबर | भूखंड क्रमांक | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | २६ | १५६ | ५८० |

वर नमूद भूखंडाबाबत आमच्या अशिल म्हणजेच श्री.राम नारायण मुंडकर, यांनी त्यांच्या दाव्या भूखंडामधील १/३ हिश्श्याकरिता स्पे.मु. नं.१११/२०१९ अन्वये दावा दाखल केलेला असून सदर दाव्याबाबत पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात दस्त क्र.पवल-१-४१८३/२०२० अन्वये नोटीस ऑफिस लिस् पेंडन्स् देखील नोंदणीकृत करून घेतलेली आहे.

तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेने सदर भूखंडाबाबत आमच्या अशिलांच्या लेखी संमती शिवाय कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नयेत. याउप्परही सदर भूखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला आणि त्यामुळे आमच्या अशिलांचे काही नुकसान झाल्यास सदर नुकसानीस त्या व्यक्तीस जबाबदार धरले जाईल, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१४/०२/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं.२२, पहिला मजला, जुन्या तहील कार्यालया समोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**



मे.सोनवणे सो।

प्रो.जमा.२-२५ — अर्जदाराचे वकील ॲड.श्रृती द. शिंदे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/०४/२०२२

कै.सुरेश नारायण पोतदार तर्फे वारस
श्रीम.सुषमा सुरेश पोतदार — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.सुरेश नारायण पोतदार हे दि.०८/०७/२०२१ रोजी मौजे : सी.१०२, श्री गणेश दर्शन सोसायटी, महापालिका रोड, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचा तपशिल**

| खाते क्र. | रक्कम |
|---|---|
| SB ३४४८०२०३००४७०२७ व लॉक नं.GB-24 | ५३,०६९/- |

कै.सुरेश नारायण पोतदार यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ९/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



### उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड, पिन नं.४०२२०१
ई-निविदेद्वारे कामांची सूचना

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाचे ठिकाण | ई-निविदा रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | पिगोंड कं.नं.२१५ येथील १५ हे रोपवना भोवती चेनलिंग फेंन्सिंग करणे वनक्षेत्र नागोठणे ता.रोहा, जि.रायगड | पिगोंडा | १२५७५५२/- |
| २ | बेणसे कं.नं.२०७, २०९ येथील ३० हे रोपवना भोवती चेनलिंक फेंन्सिंग करणे वनक्षेत्र नागोठणे ता.रोहा, जि.रायगड | बेणसे | २५१७६७६/- |
| ३ | राबगाव कं.नं.३९८ येथील २५ हे रोपवना भोवती चेनलिंक फेंन्सिंग करणे वनक्षेत्र नागोठणे ता.रोहा, जि.रायगड | राबगाव | २०९७६२२/- |
| ४ | कोलेटी कं.नं.४१६ येथील २० हे रोपवना भोवती चेनलिंक फेंन्सिंग करणे वनक्षेत्र नागोठणे ता.रोहा, जि.रायगड | कोलेटी | १६७८४५१/- |
| ५ | वासगाव पूर्व कं.नं.४०५ येथील २० हे रोपवना भोवती चेनलिंक फेन्सिंग करणे वनक्षेत्र नागोठणे ता.रोहा, जि.रायगड | वासगाव पूर्व | १६७८४५१/- |

सदर कामाची ई-निविदा उघडण्याची सुरूवातीची तारीख १६/०२/२०२२ व अंतिम तारीख २५/०२/२०२२ आहे. तसेच वरील कामासंदर्भात http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर ई-निविदाबाबतच्या अटी / शर्तीसह सर्व माहिती उपलब्ध आहे.

**सही/-**
**आशिष ठाकरे (भा.व.से.)**
**उप वनसंरक्षक, अलिबाग**

क्र.जिमाका/राअ/जाहि/२२७/२०२१-२२ दि.१४/०२/२०२२